मा. जिल्हाधिकारी सो धुळे यांचे कडील आदेश क्रमांक/कक्ष-१/बिनशेती/एन.ए.एस.आर/६४/१३ दिनांक- 17-10-2015 अन्वये सनद

नियम पांच

(नियम ७ पहा)

नियोजन प्राधिका-यांचा अधिकारीतेत असलेल्या जमिनीच्या धारकाला द्यावयाचा सनदेचा नमुना

ज्या अर्थी धुळे जिल्ह्याचा ता.जि. धुळे धुळे तालुक्यातील मौजे- वलवाडी गावातील भुमापन कमांक १३३/२ चे वरिष्ठ धारक/भोगवटदार/कुळ/जयाचा सात या पुढे अर्जदार असा उल्लेख करण्यात आला आहे आणि संदर्भा नुसार अनुज्ञेय असल्यास त्या संज्ञेत त्याचे वारस मृत्युपत्र व्यवस्थापन, कारभारी आणि अभीहस्ता ककिती यांचा समावेश होईल असलेले मातोश्री पाटीलनगर वाडीभोकर रोड, देवपूर धुळे येथिल रहीवासी श्री. गोपाळ काशिनाथ बुळे (२) प्रितेश गोपाळ बुळे (३) प्रवेश गोपाळ बुळे यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनीयम १९६६ (ज्याचा यात पुढे "उक्त महसुल अधिनीयम" असा उल्लेख करण्यात अला आहे व त्या सज्ञेत संदर्भा नुसार अनुज्ञेय असल्यास त्या अन्वयचे नियम व आदेश याचा समावेश होतो. ) याचा कलम ४४ अन्वये, या सोबतच्या परिशिष्ट एकमध्ये वर्णन केलेल्या आणि जागेच्या नकाशावर लाल रंगाने अक्षरांनी दर्शविलेल्या भुमापन कमांक १३३/२ चे क्षेत्र ०हे १७ आर चा भाग असलेल्या व [१७०० चौ.मी.] क्षेत्रफळ असलेल्या किंवा या पेक्षा थोड्या कमीअधिक मापाच्या असलेल्या भुरवंडाचा( ज्याचा यापुढे उक्त भुरवंड असा उल्लेख करण्यात आला आहे.)

रहिवास प्रयोजनासाठी वापर करण्याचा परवानगी करीता धुळे ज्या जिल्हाधिकोऱ्या कडे ( ज्याचा या पुढे जिल्हाधिकारी असा उल्लेख केला असुन त्या सज्ञेत या अधिकार पत्रान्वये त्याच्या शक्तीचा वापर करणेसाठी व कर्तव्यपार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी ज्यास नियुक्त करील अशाकोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो.) अर्ज केला आहे.

त्या अर्थी मौजे वलवाडी ता.जि. धुळे च्या ग्रामपंचायत / नगरपालीकेने/ महानगरपालीकेने इमारतीच्या बांधकामास परवानगी दीलेली आहे.

त्या अर्थी आत्ता , असे प्रमाणीत करण्गात येतेकी उक्त अधिनीयमाच्या उनबंधिस अधिन राहुन आणि पुढील शर्तीवर उक्त भुरवंड — — प्रयोजनासाठी —— वापरण्याची देण्यात येत आहे.

१) जमिन समतल करणे व ती साफ करणे:- ज्या साठी परवानगी देण्यात आली आहे त्या विशिष्ट अकुशिक प्रयोजनात योग्य होण्यासाठी व आरोग्य विधात परीस्थीतीस प्रतिबंध होण्यासाठी जमिन पुरेशी समतल व साफ करण्यास अर्जदार बांधलेला असेल.

२) आकारणी :- अर्जदार उक्त भुखंडाच्या संबंधात यापुर्वी बसविण्यत आलेल्या आकारणि एवजी राज्यशासनाला दिनांक- 01/08/2015 रोजी सुरु ~~दहा~~ पांच वर्षाच्या मुदती मध्ये दरवर्षी रु. 1360/- रुपयांची ( एक हजार तीनशे साठ मात्र ) वार्षिक आकरणी देईल आणि उक्त ~~दहा~~ पांच वर्षाची मुदत संपल्या नंतर जिल्हाधिकाऱ्यांकडुन उक्त अधिनीयमान्वये वेळोवेळी निश्चीत करण्यात यईल अशी सुधारीत आकारणी देईल.

३) वापर:- अर्जदाराने रहिवास ( ज्याप्रयोजनासाठी परवानगी देण्यात आली असेल ते विशिष्ट प्रयोजन येथे लीहावे.) या व्यतीरीक्त असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी जमिनीचा आणि त्यावर उभारलेल्या किंवा उभारावयाच्या इमारतीचा जिल्हाधिकाऱ्याच्या पुर्व मंजुरीशिवाय वापर करता कामानये अर्जदाराने या सोबतच्या परीशिष्ट २ मध्ये असलेल्या शर्तीचे यथोचीत्तरीत्या पालनकेले पाहीजे.

४) बांधकामाबाबतची कालमर्यादा अर्जदाराने या अधिकारपत्राच्या तारखेपासुन तीन वर्षाच्या आत उक्त भूखंडावर भरी व कायमस्वरुपाचे सुरु केले पाहीजे. त्याने तसे न केल्यास जिल्हाधिकाऱ्याकडून वेळोवेळी मुदत वाढविण्यात आली नसेल तर देण्यात आलेली परवानगी रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

५) पट्टी देण्यासंबंधीचे दायित्वः - अर्जदाराने उक्त जमिनीवर आकरण्याजोगे सर्व कर पट्टया आणि उपकर दिले पाहिजेत.

६) शास्ती विषयक खंड :- (अ) अर्जदाराने पूर्व गावी शर्तीपैकी कोणत्यही शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये अर्जदार ज्या शिक्षेस पात्र होईल अशा इतर कोणत्या ही शिक्षेस बाध न आणता जिल्याधिकाऱ्यास तो निर्देशीत करील असा दंड किंवा अशी आकारणी रक्कम व उक्त अधिनियमाचे कलम ३२१ चे पोट कलम (२) ला आधिन राहुन तो निर्देशित करील असा दंड भरल्यावर उक्त भुखंड अर्जदाराच्या ताब्यात च चालु ठेवता येईल.

उपखंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिकारपत्राच्या उपबंधाविरुध्द कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभारणयात आल्यास किंवा वापरण्यात आल्यास जिल्हाअधिकाऱ्याने विशिष्ट केलेल्या मुदतीत काढुन टाकण्याबाबत किंवा त्यात बदल करण्या बाबत जिल्हाधिकाऱ्याने निर्देश देणे हे वैघ्य असेल आणि विनिदिष्टह मुदतीत अशाप्रकारे ( इमारत किंवा बांधकाम ) काढुन टाकण्यात आले किंवा नाही त्यात बदल करण्यात आला नाही तर त्याला ते काढुन टाकण्याची किंवा त्यात बदल करणयाची व्यवस्था करता येईल आणि त्याबाबतचा खर्च अर्जदाराकडुन जमिन महसूलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुल करता येईल.

3

७) अधिनियमाचे उपबंध लागु असणे :- यात उपबंधीत केले असेल त्या व्यातिरिक्त हे अधिकारपत्र उक्त अधिनिमाच्या आणि त्या खालील नियमांच्या उपबंधास अधीन असेल.

## नकाशा




## परिशिष्ट एक

| लांबी व रुंदी<br>उत्तर - दक्षिण<br>पूर्व- पश्चिम | पृष्ठभागाचे<br>एकूण क्षेत्रफळ | सीमा<br>उत्तर- दक्षिण<br>पूर्व - पश्चिम | शेरा |
|---|---|---|---|
| मौजे-वडवाडी<br>ता०जि० धुळे येथील<br>सर्व्हे / गट नं. 133/2 | हे. आर<br>0 . 17<br>[1700 चौ.मी] | पूर्वेस — रोड<br>पश्चिमेस — ग.नं. 146<br>दक्षिणेस — ग.नं. 133/4<br>उत्तरेस — ग.नं. 133/1 | |

## परिशिष्ट दोन

१) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये नियोजन प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या आरखडयातअनुसरुन अर्जदाराने भूखंडावर बांधकाम केले पाहीजे.

२) अर्जदारने ईमारतीच्या प्रमाणाचे आणि नियंत्रण रेषाचे पालन केले पाहीजे आणि सोबतच्या नकाशातील लाल रंगाने चिन्हांकित केलेले क्षेत्र मालकी जागा म्हणून ठेवले पाहिजे.

३) हे अधिकारपत्र पुढील विशेष शर्तींच्या अधीन राहिल.

अ) मा.जिल्हाधिकारी सो. धुळे यांचे कडील आदेश क्र.का/कक्ष-1/बिनशेती/एनएपी/एसआर/-66/13 दिनांक:-17-10-2015 अन्वये आदेशातील अटी/शर्तीस अधिन राहून

ब) मा.नगररचनाकार धुळे यांचे कडील पत्र क्र.नरधु/अभिन्यास/मौजे-वलवाडी ता.जि.धुळे/ग.नं.133/2/82 दिनांक:15-1-2015च्या कमेंसमेंट सर्टिफिकेट मध्ये नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीस अधिन राहून

इत्यादी

या गोष्टींची साक्ष म्हणून धुळे च्या जिल्हाधिकाऱ्याने महाराष्ट्र राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आहे आणि आपल्या पदाची मोहर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा यावर रोजी आपली सही केली आहेच.

तहसिलदार, धुळे

मंडळ अधिकारी,
भाग धुळे (शहर)

अर्जदाराची सही / ५

1) PGM
2) Pramod
3) Gm

साक्षीदारांच्या सह्या

1) श्री. रमेश राजे. भोसले
2) श्री. बाळकृष्ण ...

जिल्हाधिकारी, धुळे

आम्ही असे जाहीर करतो की जिने या सनदेवर सही केली आहे ती अ, ब ही व्यक्ती आमच्या वैयक्तिक माहितीप्रमाणे ती जी व्यक्ती असल्याचे म्हणत आहे आणि तिने आमच्या समक्ष आपली सही केली आहे.

सही/-

मंडळ अधिकारी,
भाग धुळे (शहर)

वाचले:-1) श्री.गोपाल काशिनाथ केले वगैरे-2 रा.धुळे ता. जि धुळे यांचा दि.21/6/2013 चा अर्ज व प्रतिज्ञापत्र दि.20/8/2015

2) तहसीलदार,धुळे यांचेकडील चौकशी अहवाल क्र. गांवठाण/कावि/1044/2013 दि.3/8/2013.

3) नगर रचनाकार धुळे यांचेकडील पत्र जा.क्र.नरधु/अभिन्यास/मौजे-वलवाडी ता.धुळे/ग.नं.133/2/82 दि.15/1/2005

4) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम,1966 चे कलम 44 तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (जमीनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम,1969.

क्रमांक/ब/कक्ष-1/बिनशेती/एनएनएसआर-66 /13
जिल्हाधिकारी,धुळे यांचे कार्यालय,
दिनांक :- 17/10/2015.-

आदेश

मौजे-वलवाडी ता.जि.धुळे येथील येथील ग.नं.133/2 क्षेत्र 0 हे 17 आर (1700 चौ.मी) आकार रु.1.90 पैसे ही शेतजमीन श्री.गोपाळ काशिनाथ केले, श्री.प्रितेश गोपाळ केले, श्री.प्रणेश गोपाळ केले सर्व रा.धुळे ता.जि.धुळे यांच्या सामाईक मालकीची आहे. त्यांनी सदर शेतजमीन रहिवास प्रयोजनार्थ बिनशेतीकडे वर्ग होण्याकरिता उपोद्घातात नमुद नं.1 अर्जान्वये विनंती केलेली आहे. या अनुषंगाने तहसीलदार धुळे यांनी उपोद्घातात नमुद क्र.2 अन्वये सविस्तर चौकशी अहवाल सादर केला आहे. प्रस्तुत प्रकरणी चौकशी कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की,

अ) अर्जदार हे सदर जमीनीचे मालक असून सदर जमीनीवर कोणाचेही इतर हक्क/कुळ हक्क नाहीत तसेच मालकी हक्काबाबत सहधारकांत कोणतेही वाद नाहीत.

ब) नगर विकास आराखडयात सदर जमीन कोणत्याही विशिष्ट कारणासाठी राखुन ठेवलेली नाही सदर जमीनीस बिनशेती परवानगी देण्यास नगर रचनाकार धुळे यांची उपोद्घातात नमुद क्र.3 अन्वये हरकत नसुन अर्जदार यांनी सदर जमीनीचा नगर रचनाकार धुळे यांचेकडुन मंजुर केलेला अभिन्यास दाखल केलेला आहे.

क) रस्त्या लगतच्या सिमा प्रदेशाचा विकास करण्यासंबंधीच्या नियमाद्वारे घातलेले निर्बंध व विहीत केलेली बांधकाम विषयक नियंत्रणे यांचे तसेच ज्या शर्तीवर परवानगी दिली जाईल त्या शर्तीचे पालन करण्यास अर्जदार तयार आहेत.

ड) प्रस्तुत मिळकत भुसंपादनासाठी राखीव नसुन कोणत्याही सरकारी वा सार्वजनिक प्रयोजनासाठी नजीकच्या भविष्यात ती संपादन केली जाण्याचा संभव नाही. याबाबत उपजिल्हाधिकारी, भुसपांदन क्र.1 धुळे यांचे पत्र क्र.दि.28/6/2013, उपजिल्हाधिकारी, भुसपांदन क्र.1 धुळे यांचे पत्र क्र.दि.28/6/2013, उपजिल्हाधिकारी भू.स.मध्यम पाटबंधारे प्रकल्प,धुळे यांचे पत्र दि.29/6/2013, व उपजिल्हाधिकारी भुसंपादन सामान्य धुळे यांचे पत्र दि.28/6/2013, उपविभागीय अधिकारी धुळे भाग धुळे यांचे कडिल पत्र दि.5/7/2013 अन्वये खात्री करण्यात आलेली आहे.

इ) प्रस्तुतची मिळकत ही ईनाम जमीनीपैकी नाही.

वरील मुद्दे विचारात घेता, मी जिल्हाधिकारी,धुळे उपोद्घातील अ.क्र. 4 अन्वये मला प्राप्त अधिकाराचा वापर करुन याद्वारे मौजे-वलवाडी ता.जि.धुळे येथील येथील ग.नं.133/2 क्षेत्र 0 हे 17 आर (1700 चौ.मी) या क्षेत्रास रहिवास प्रयोजनार्थ बिनशेतीकडे वर्ग करण्यास महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, 1966 मधील कलम 44 अन्वये खालील अटी व शर्तीवर परवानगी देत आहे.

अटी व शर्ती :-

1) सदरची परवानगी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम,1966 व त्याखालील नियमांमधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

2) अर्जदार यांनी जमीनीचा किंवा त्यावरील इमारतीचा उपयोग ज्या कारणास्तव परवानगी दि असेल, त्या कारणास्तवच करावा. त्यात बदल करावयाचा असल्यास जिल्हाधिकारी,धुळे यांची परवानगी घेण्यात यावी.

3) अर्जदार यांनी बिनशेती परवानगी दिलेल्या तारखेपासुन एका वर्षाच्या आत मंजुर आराखडयाप्रमाणे सक्षम प्राधिका-याकडून प्लॉटांचे सिमांकन करुन त्या जमीनीचा रस्ते व गटारे बांधकामासह काटेकोरपणे विकास करावा. तसेच महाराष्ट्र जमीन महसुल (जमीनीच्या वापरात बदल आणि अकृषिक आकारणी) नियम, 1969 यातील नमुना नं. 5 मध्ये सनद (कबुलायत) करुन घ्यावी. अन्यथा प्रति प्लॉट र. रु.500/- दंड वसुलीस पात्र राहील.

4) अर्जदार यांनी सदर जमीनीवर बांधकाम करणेपुर्वी बांधकामाचा आराखडा स्थानिक नियोजन प्राधिकारी अथवा नगर रचनाकार यांचेकडून मंजुर करुन घ्यावा. तसेच बांधकाम हे पक्क्या स्वरुपाचे व चांगल्या दर्जाचे साहित्याने करावे.

5) नगर रचनाकार धुळे यांचेकडील पत्र जा.क्र.नरधु/अभिन्यास/मौजे-वलवाडी ता.धुळे/ग.नं.133/2/82 दि.15/1/2005 च्या **कमेंसमेंट सर्टिफिकेट** मध्ये नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती अर्जदारास बंधनकारक राहतील.

6) रहिवास प्रयोजनासाठी मंजुर केलेल्या जागेवर गुरांचा गोठा ठेवता येणार नाही. अभिन्यासातील भुखंडांस पाणी पुरवठा व सांड पाण्याच्या निच-याची योग्य ती व्यवस्था करण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहिल. अभिन्यासातील भुखंडांत झाडे असल्यास विना परवानगी तोडू नयेत. तसेच मोकळया जागेत झाडे लावावीत.

7) अभिन्यासात दर्शविलेली खुली जागा व रस्ते/ गटारी नियोजन प्राधिकरणाचे निर्देशाप्रमाणे विकसीत करुन व कुंपण भिंत बांधुन संबंधित स्थानिक प्राधिकरणाचे ताब्यात पुढील देखभालीसाठी नाम मात्र (रु.1/-) शुल्कावर हस्तांतरीत करण्यात यावेत. तसेच अभिन्यासातील सर्व रस्ते सभोवतालचे जमीनमालकांना पोहोच रस्त्यासाठी वापर करु द्यावेत.

8) मंजुर तात्पुरत्या अभिन्यासानुसार (ग.न.133/2 ) रहिवास भुखंडाचे क्षेत्र 239.00 चौ.मी.,व **रस्त्याखालील क्षेत्र 434.44** चौ.मी.,तसेच **प्युचर डेव्ह.1026.56** चौ.मी. राहील.

9) अर्जदार यांनी बिनशेतीचा वापर सुरु केल्याचे तारखेपासुन बिनशेतीसारा प्रति चौ.मी.ला रु. 0.80 याप्रमाणे भरावयाचा आहे. तसेच वेळोवेळी बदलणारा बिनशेती सारा भरणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

10) अर्जदार यांनी मोजणी फी रक्कम रु. 8000/- (अक्षरी रुपये- आठ हजारे मात्र) सरकार जमा केलेली आहे. तसेच **बिनशेती सारा (सन 2014-15) रक्कम रु. 12,240/-** तहसीलदार धुळे यांचेमार्फत सरकार जमा केलेली आहे. उप अधिक्षक भुमी अभिलेख, धुळे यांचेकडुन मोजणी केल्यानंतर सदर जमीनीच्या क्षेत्रात बदल झाल्यास बिनशेती आदेशातील आकार व क्षेत्र हे सनद (कबुलायत) मध्ये बदल करणेस पात्र राहील.

11) अर्जदार यांनी बिनशेती वापर सुरु केल्यातारखेपासुन तीन वर्षाचे आत त्या जमीनीवर इमारतीचे बांधकाम करावे अथवा बांधकामाची मुदत जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडुन शासनाने ठरवुन दिलेल्या रकमेवर वाढवुन घ्यावी.

12) अर्जदाराने उक्त जमीनीवर यापुर्वी मंजुर आराखडयाप्रमाणे बांधकाम केले असेल तर त्यात कोणत्याही प्रकारचा फेरबदल किंवा जादा बांधकाम स्थानिक नियोजन प्राधिकारी किंवा नगर रचना, धुळे यांचे आगाऊ परवानगीशिवाय करु नये.

13) अर्जदाराने आदेशातील आणि सनदेत नमुद केलेल्या शर्तींचे उल्लंघन केले असल्यास

अ) म.जिल्हाधिकारी,धुळे यांनी उक्त अधिनियमांच्या उपबंधान्वये ज्या इतर कोणत्याही शर्तीनुसार अर्जदार पात्र असतील त्या शर्तीस बाधा न आणता सक्षम प्राधिकारी जे निर्देश देतील असा दंड आणि आकारणी दिल्यानंतर उक्त जमीन अर्जदाराचे भोगवटयात असल्याचे चालु ठेवता येईल.

ब) वरील प्रमाणे कोणत्याही अटींचे उल्लंघन केल्यास उभारण्यात आलेली किंवा वापरात असलेली इमारत विहीत केलेल्या कालावधीत काढुन टाकण्याबाबत किंवा तीत बदल करणेबाबत महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम,1966 चे कलम 45 प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

14) सदरची परवानगी कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,धुळे यांचे पत्र दि.4/9/2015, म.कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम विभाग,धुळे यांचे पत्र दि.15/7/2013 म.जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.धुळे यांचे पत्र दि.11/7/2013,कार्यकारी अभियंता,

म.रा.वि.वि.कं.मर्या.शहर तथा ग्रामीण विभाग,धुळे यांचे पत्र दि.2/8/2013, सहा.महाप्रबंधक,भारत संचार निगम लि.यांचे पत्र दि.11/7/2013 व नगर रचनाकार धुळे यांचेकडील पत्र दि.15/1/2005 तसेच ग्रामपंचायत वलवाडी ता.धुळे यांचे कडिल दाखला दि.1/7/2013 ला अनुसरुन दिलेली असुन त्यांचेकडील पत्रातील सर्व अटी / शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

15) परवानगी धारकाने जमीनीचा बिगरशेतकी उपयोग करण्यास आणि किंवा वापरात बदल करण्यास सुरुवात केल्याची तारीख एक महिन्याच्या आंत तलाठयामार्फत तहसिलदार धुळे यांना कळविली पाहिजे. तसे न केल्यास सदर परवानगी धारक महाराष्ट्र जमीन महसूल (जमीनीच्या वापरांत बदल व अकृषिक आकारणी) नियम 1969 यातील नियम 6 अन्वये कारवाईस पात्र ठरेल.

16) अर्जदारांस सदर आदेशात नगुद शर्तीवर भुखंडाची विक्री/हस्तांतरण सनदेनंतरच करता येईल व हस्तांतरण दस्तऐवजात त्याबाबत खास उल्लेख करावा लागेल.

17) अर्जदार यांनी प्रस्तुत आदेशात मंजुरी दिलेल्या भूखंडाचे/पोटहिस्सांचे विभाजन म.जिल्हाधिकारी,धुळे (किंवा सक्षम प्राधिकारी) यांचे पुर्व परवानगीशिवाय करु नये.

18) सदरची परवानगी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायदयातील तरतुदी व नियमांस अधीन राहील.उदा.मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम,1948 तसेच महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम, 1965, इ.

19) उक्त जमीनीच्या मालकी हक्काबाबत अथवा क्षेत्रफळाबाबत भविष्यात वादविवाद निर्माण झाल्यास निराकरण करण्याची संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांची राहील.

20) प्रस्तुतची बिनशेती परवानगी अर्जदाराचे अभिकथनावर तसेच दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन देण्यांत आलेली असून भविष्यात त्यात काही खोटेपणा आढळल्यांस त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

वरीलपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास दिलेली परवानगी तात्काळ रद्द करण्यात येईल.

स्थळ प्रतिवर म.जिल्हाधिकारी
यांची स्वाक्षरी असे.

सही XXX/-
जिल्हाधिकारी धुळे

प्रत :- श्री.गोपाळ काशिनाथ केले वगैरे-2 रा.धुळे ता. जि.धुळे

प्रत :- म.नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य,नवीन प्रशासकीय इमारत,तळमजला,विधान भवन समोर,पुणे-411001.

प्रत:- उपअधिक्षक, भुमि अभिलेख, धुळे यांचेकडेस माहितीसाठी रवाना.

प्रत :- नगर रचनाकार धुळे यांना माहितीसाठी अग्रेषित.

प्रत :- म.सहाय्यक संचालक, नगर रचना आणि मुल्यांकन विभाग नाशिक, एन.डी.ए.टॉवर्स, 2 रा मजला,संभाजी चौक, उंटवाडी रोड, नाशिक-2.

प्रत :- म. तहसीलदार धुळे यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

2/.अर्जदार यांनी रहिवास प्रयोजनार्थ बिनशेती वापर सुरु केला आहे किंवा नाही याकडे लक्ष पूरवावे व बिनशेती आकार वसूल करावा. तसेच अर्जदाराकडून विहित मुदतीत सनद (नमूना पाच मध्ये) तयार करुन घेऊन गावदप्तरी नोंदी घ्याव्यात.

जिल्हाधिकारी धुळे करीता 12.10.15